## Credits and acknowledgements: योगदानाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख



### कैलासवासी हरी कृष्ण करमरकर आणि कैलासवासी गौरबाई करमरकर

Late Hari Krishna Karmarkara & Gaurbai Hari Karmarkar

My late maternal grandparents introduced Shreemad Bhagawad Geeta to me in my early childhood. My grandfather used to recite one chapter of Shreemad Bhagawad Geeta every day and encouraged me to recite it with him. He taught me swimming and developed self confidence in me.

तव सान्निध्ये बालमनी नकळत धडले संस्कार ।

त्या संस्कारे प्रगटले गीता तत्वज्ञान साकार ॥ १ ॥

गीताध्ययनी मनःचक्षू साकारते तव मूर्ती ।

तत्क्षणी गीताज्ञान प्रदीप उजळित आली स्फूर्ती ॥ २ ॥

मानवजीवनी यथार्थ सांगे ' सार '  गीतागाथा ।

तव स्मृतीस्तव मत्कार्य अर्पूनी लववितो मी माथा ॥ ३ ॥



श्रीमती मालतीताई त्रिंबक कुंटे (जन्मदिनांक ३१ - १० - १९३१)

Ms. Maalatitai Trimbaka Kunte (Birth date 31-10-31)

Being a Sanskrit language expert and a renowned Sanskrit teacher with over 50 years of study of Bhagawad Geeta; her constant inspiration and the most significant contribution to the content development of this website has been the hallmark of this entire project. She brought clarity of thought and purpose to our efforts. She set exacting standards and target goal for the entire project. I would like to express my sincere and heartfelt gratitude to her for her constant encouragement to me to study Sanskrit language and our rich cultural heritage.




सौ. कुसुमताई हनुमंत जोशी (जन्मदिनांक १४ - ११ - १९३१)

Mrs. Kusumtai Hanumant Joshi (Birth date 14-11-1931)

My mother has been a teacher of Marathi and English languages and she retired from Captain Ravindra Madhava Oak High school in Kalyan. Since my early childhood, she has encouraged me to study and recite Bhagawad Geeta. She has imbibed in me a strong sense of pride in our rich cultural heritage and has set very exacting standards for me to achieve. She contributed to this project by developing content in Marathi language and proof reading the entire content of the website. I would like to express my sincere and heartfelt gratitude to her for her constant encouragement to me to excel in every walk of life.

Please refer to a personal opinion about Shreemad Bhagawad Geeta by Mrs. Kusumtai Hanumant Joshi, by visiting the page no. 10 of this pdf file.



## श्री. सुधीर मधुकर देशपांडे (जन्मदिनांक ३ - ९ - १९५५)

## Mr. Sudhir Madhukar Deshpande (Birth date 3 – 9 – 1955)

Sudhir Madhukar Deshpande has been a student of GEI's High school in Kalyan and an alumnus of Indian Institute of Technology, Bombay (M. Tech in Electrical Engineering, 1978 batch). He has studied Sanskrit language under the guidance of his father Late Madhukar Krishnaji Deshpande and a renowned Sanskrit expert Pandit Dattatrey Keshav Aacharya, Sahityacharya. Sudhir has been a recipient of "Jagannath Shankarsheth Scholarship" for his outstanding performance in the annual Sanskrit language examination. He stood 4th in the merit list in SSC Board examination in the year 1971. He has made valuable suggestions from time to time and helped me in editing the content of this website. I would like to express my sincere and heartfelt gratitude to him for his constant encouragement to me to have a balanced approach in the study of modern science & technology as well as Bhagawad Geeta.



सौ. वर्षा किरण पांडे (जन्मदिनांक २१ - ८ - १९६५)

Mrs. Varsha Kiran Pande (Birth date 21-8-1965)

She has dedicated her life to the spread of knowledge of Bhagawad Geeta. So far she has given 300 lectures on Bhagawad Geeta at various forums. She has contributed to the content development by reciting the entire 701 Shlokas of Bhagawad Geeta in 18 chapters in her clear diction of the Sanskrit language. I would like to express my sincere and heartfelt gratitude to her.

Please refer to a personal opinion about Shreemad Bhagawad Geeta by Mrs. Varsha Kiran Pande, by visiting page no. 12 of this pdf file.



श्री. जसवंतलाल लक्ष्मीदास दमाणिया (जन्मदिनांक १५ - ६ - १९३८)

Mr. Jasavantlal Laxmidas Damania (Birth date 15 - 6 - 1938)

He is a scholar of Sanskrit language. He has studied various ancient Sanskrit scriptures in great details. With the gift of excellent memory, he is able to quote the relevant references from various scriptures along with the most appropriate meaning. He is also a "Bhagawad Geeta" expert of great reputation. He had the fortune to receive training under late "Dada Pandurang Shaastree Athavale". He has made valuable suggestions to me from time to time and helped me in editing the content of this website. I would like to express my sincere and heartfelt gratitude to him for his constant encouragement to me.



श्री. बन्सी लाल महाजन (जन्मदिनांक २५ – १२ - १९४७)

Mr. Bansi Lal Mahajan (Birth date 25 – 12 – 1947)

He is a renowned scholar of Bhagawad Geeta. He has made valuable suggestions from time to time and helped me in editing the content in Hindi language of this website. I would like to express my sincere and heartfelt gratitude to him for his constant encouragement to me.



श्री. ललित चौधरी (जन्मदिनांक १३ - १० - १९७३)

Mr. Lalit Chaudhari (Birth date 13 – 10 - 1973)

He is an expert in electronics and computer engineering. He has helped me in identifying proper Devanagari font, Devanagari text editing software programme and testing the website content on various computers of different make based on different computer operating systems like Microsoft Windows XP & Vista, Linux and Apple OS/X. I would like to express my sincere and heartfelt gratitude to him for his constant encouragement and support to me on a true 24 x 7 basis.



श्री. प्रकाश अडवाणी (जन्मदिनांक २२ - ५ - १९७२)

Mr. Prakash Advani (Birth date 22 – 5 - 1972)

He is an expert in computer software programming and especially in Linux operating system based applications. He has helped me in testing the website content on various computers. He has made a generous offer of hosting the website on a free of charge basis on his web space. I would like to express my sincere and heartfelt gratitude to him for his constant encouragement and support to me.

## माझे मनोगत …सौ. कुसुम हनुमंत जोशी. अंधेरी – पश्चिम. मुंबई. महाराष्ट्र

“मी तीन भाषांतून गीतेचे शब्दार्थासह भाषांतर लिहिणार आहे. आई , तू मला मदत करशील का ?”; या राजूच्या प्रश्नाला, मी लगेच होकार दिला.

गीता वाचन हा माझा आवडीचा विषय. लहानपणापासून वडिलांनी केलेले गीता व ज्ञानेश्वरीचे पठण मनावर कुठेतरी ठसलेले. मी स्वतः लहानपणी ३ ते ४ अध्याय पठणपर्धेसाठी पाठ केलेले आठवतात. पुढील आयुष्यात अभ्यासात व वाचनात गीतेचा संदर्भ येत गेला. अनेक विद्वानांची भाषणे ऐकल्यामुळे गोडी निर्माण झाली.

गीता म्हणजे प्रत्यक्ष भगवंताने गाईलेले तत्त्वज्ञान. शोकाने उद्विग्न झालेला अर्जुन, हातातील धनुष्य खाली ठेवून, “मी युद्ध करणार नाही” असे म्हणाला आणि भगवान श्रीकृष्णाने त्याला जीव - जगत आणि जगदीश, शाश्वत आणि अशाश्वत, स्वधर्म आणि निष्काम कर्म अशा अनेक गोष्टी सांगत - सांगत ‘नष्टो मोहः…करिष्ये वचनम् तव’ असे पार्थाकडून वदवून, त्याला धर्मयुद्धास तयार केले.

विनोबा म्हणतात, “गीता नुसती वाचू नका तर जगण्यास शिका”. पण म्हणजे नेमके काय? मी कोणी विदुषी नाही. अनेक विद्वानांनी गीतेतील जीवनार्थ खूप खोलवर जाऊन सांगितला आहे. अनेक भाषांतून गीतेची भाषांतरे झाली आहेत. गीता म्हणजे बालकाला मातेकडून मिळालेले स्तन्य आहे.

‘हा देश स्तन्य प्याला गीतार्थ अमृताचे, आचंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे.’

गीतेचा माझा जो थोडाफार अभ्यास झाला, त्यातून पुढील साधे सरळ गीतासार जे मला कळले ते असे…

- या विश्वाचा नियंता परमेश्वर, व्यक्ती नव्हे तर परमशक्ती आहे.
- आपण आपले जन्मोजन्मीचे पूर्व सुकृत बरोबर घे ऊन जन्माला येतो.
- पशूयोनीत जन्माला न येता, मनुष्यजन्म या जन्मी लाभला - हे आपले सद्भाग्य होय.

- कोणत्या कुळात जन्माला येणे हे आपल्या हातात नाही, पण चांगले जीवन घडविणे हे केवळ आपल्या हातात आहे.
- सत्त्व रज आणि तम या तीन गुणांचे कमी जास्त मिश्रण प्रत्येक मानवात आहे पण तम व रज गुणांचे प्रमाण कमी करत सत्त्व गुण वाढवित जाणे म्हणजे जीवन उन्नत करणे.
- दुसऱ्याला न दुखविणे, जितकी जास्तीत जास्त मदत करता येईल तितकी करणे, अहंकार - दंभ - दर्प – मोह - मत्सर वगैरे दुर्गुणांचा त्याग करण्याचा सतत प्रयत्न करणे व आपण स्वतः आनंदित राहून इतरांना आनंद देणे हे आपले कर्तव्य आहे.
- 'योगः कर्मसु कौशलम्' - आपल्या वाट्याला आलेले जे कर्म ते निष्कामपणे जास्तीत जास्त चांगल्याप्रकारे करणे. 'कर्तव्याने घडतो माणूस, जाणून कर्मार्था'.
- स्वधर्म म्हणजे हिंदू-मुस्लीम नव्हे तर 'सदाचार नीतीहुनी आगळा न धर्म'.
- प्रत्येक प्राणिमात्र म्हणजे परमेश्वराचा अंश आहे असे समजून वागणे, समत्व ठेवणे. 'जे जे भेटे भूत, तया मानी भगवंत'.
- सुखदुःख - मानापमान - लाभालाभ या गोष्टी जीवनात जेव्हा येतील; तेव्हा हतबद्ध होऊ नकोस, संयमाने वाग, उतू नकोस, मातू नकोस आणि घेतला वसा सोडू नकोस.
- 'सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्ठो'. नित्य निज-हृदयी परमेश्वराशी संवाद साध व त्याचा हात पकडून वाटचाल करशील तर तो तुझा उत्तम मित्र होईल. पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून "मीच सर्व गोष्टी करणारा आहे" असा अहंकार बाळगून उन्मत्त होशील; तर तूच त्याच्याशी शत्रूत्व पत्करशील व स्वतःच्या नाशाला कारणीभूत ठरशील.
- त्या आदिशक्ती परमेश्वराला शरण जा व स्वधर्म जाणून कर्तव्य करण्यास सिद्ध हो आणि सतत जीवनात पाऊले चालती पंधरीची वाट याचे स्मरण ठेव.

एखाद्या गायकाने गाईलेले गाणे एका पूर्ण पिढीला मोहवून टाकते तर एखादे गीत शतकभर प्रिय होते पण जनमानसावर अजरामर ठरलेले भगवान श्रीकृष्णाने गाईलेले हे गीत आजपर्यन्त अधिराज्य गाजवित आले, आजही आहे आणि पुढेही अनंत काळ राहील यात संशय नाही.

## माझे मनोगत.....सौ. वर्षा किरण पांडे. कल्याण, महाराष्ट्र

आयुष्याच्या एका वळणावर अचानक श्रीमद् भगवद् गीतेच्या अभ्यासाला सुरुवात झाली आणि आयुष्यात बदल घडून यायला लागले, मनोबल वाढू लागले, विचारांमधील सकारत्मकता वाढली. निर्णय घेण्याची क्षमता वाढली आणि आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. हळू - हळू असे लक्षात येऊ लागले की श्रीमद् भगवद् गीता हा ग्रंथ म्हणजे जीवन जगण्याची कला सांगणारे शास्त्र आहे. आपल्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणींना खंबीरपणे सामोरे जाऊन त्यांना तोंड देऊन त्यातून मार्ग काढून जगामध्ये ताठ मानेने आणि मानाने कसे जगावे हे गीता सांगते.

गीतेमध्ये गाईडसारखी आपल्या प्रश्नाची तयार उत्तरे नाहीत पण गीताभ्यासाने, गीतेच्या मनन - चिंतनाने आणि गीता आचरणात आणण्याचा प्रयत्न केल्याने त्या प्रश्नांना, त्या समस्यांना सामोरे जाण्याची व त्यांची उकल करण्याची हिम्मत आपल्यात निर्माण होते. कारण काळानुरुप जो काही जीवनसंदेश आवश्यक आहे, तो देण्याची क्षमता गीतेच्या गर्भात आजही सुरक्षित आहे. कुठेही पाठभेद करावे लागत नाहीत, कुठेही अदलाबदल ओढाताण करावी लागत नाही आणि तरीही काळानुरुप कर्मयोग भक्तियोग ज्ञानयोग आणि अनासक्तियोग युक्त जो काही संदेश आवश्यक असेल तो गीता देते.

ज्ञानेश्वरांपासून लोकमान्य टिळक, योगी अरविंद, आचार्य विनोबा भावे, पूर्व- राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन अशा अनेक मान्यवरांनी गीतेचा - श्रीकृष्ण तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला तरी आजही गीतेचा अभ्यास सुरु आहे आणि तो सुरुच राहील. मला असे वाटते की, आयुष्याची सुसंस्कृत, समृद्ध आणि समाधानी अशी वाटचाल करण्यासाठी सदैव मार्गदर्शक ठरणारा असा ग्रंथ म्हणजे श्रीमद् भगवद् गीता.